क्रमांक : २२३९१/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : १३ नोव्हेंबर, २०२४.

**संदर्भ :-** सा.प्र.वि.शा.नि.क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.१ ऑगस्ट, २०१९

**:: ज्ञा प न ::**

या सचिवालयातील प्रधान सचिव आणि सचिव या पदावरील नियुक्ती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (सेवाप्रवेश आणि सेवेच्या शर्ती) नियम, १९७३ मधील नियम ५ मध्ये नमूद केल्यानुसार करण्यात येते. या व्यतिरिक्त 'गट-अ' ते 'गट-ड' संवर्गातील रिक्त असलेल्या पदांवर आवश्यक असणारी अर्हता धारण करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना पदोन्नती / पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयातील एकत्रित मार्गदर्शक तत्वे व या सचिवालयातील सेवाप्रवेश व सेवेच्या शर्ती यातील विहित नियमांनुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यास शिफारस करण्याकरिता **आस्थापना मंडळ** आणि **विभागीय पदोन्नती समिती** नव्याने गठीत करण्यात आली आहे. सदर आस्थापना मंडळ आणि विभागीय पदोन्नती समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील :-

**आस्थापना मंडळ**

| **गट** | **आस्थापना मंडळातील अधिकारी / सदस्य** | | **अधिकारी/सदस्य यांची एकूण संख्या** |
|---|---|---|---|
| 'गट-अ' (राजपत्रित)<br>(६ व्या वेतन आयोगानुसार ज्या पदांचे ग्रेड वेतन रु.७६००/- किंवा त्यापेक्षा जास्त तथापि रु.१०,०००/- पेक्षा कमी) | प्रधान सचिव/<br>सचिव-१ | अध्यक्ष | किमान तीन<br>किंवा<br>कमाल पाच |
| | सह सचिव/<br>उप सचिव | सदस्य | |
| | उप सचिव/<br>अवर सचिव<br>(आस्थापना - क-१ कक्ष) | सदस्य सचिव | |



\\MLS-DATASERVER\C Branch\1401\C-101\Local Disk (d)\E Drive\2024\Department Promotion Committee (D.P.C)\memo.docx

## विभागीय पदोन्नती समिती

<table>
<tr><th>गट</th><th colspan="2">विभागीय पदोन्नती समितीतील अधिकारी / सदस्य</th><th>अधिकारी/सदस्य यांची एकूण संख्या</th></tr>
<tr><td rowspan="3">'गट-अ' (राजपत्रित), 'गट-ब' (राजपत्रित) व (अराजपत्रित) तसेच 'गट-क' व गट 'ड' (६ व्या वेतन आयोगानुसार ज्या पदांचे ग्रेड वेतन रु.७५९९/- किंवा त्यापेक्षा कमी)</td><td>सह सचिव/<br>उप सचिव</td><td>अध्यक्ष</td><td rowspan="3">किमान तीन<br>किंवा<br>कमाल पाच</td></tr>
<tr><td>उप सचिव/<br>अवर सचिव</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>अवर सचिव/<br>कक्ष अधिकारी<br>(आस्थापना - क-१ कक्ष)</td><td>सदस्य सचिव</td></tr>
</table>

सदरहू विभागीय पदोन्नती समिती खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून गठीत करण्यात आली आहे :-

- **विभागीय पदोन्नती समिती किमान ३ व कमाल ५ सदस्यांची असावी.**
- **विभागीय पदोन्नती समितीच्या गठनासंदर्भातील आदेश समिती सदस्याच्या नावाने निर्गमित न करता त्यांच्या पदनामाने करावेत.**
- **विभागीय पदोन्नती समितीमध्ये मागास प्रवर्गाकरिता प्रतिनिधीत्व करणारा एक सदस्य असावा. असा सदस्य नसल्यास, समितीच्या अध्यक्षांच्या सहमतीने मागास प्रवर्गाचे प्रतिनिधीत्व करण्याकरिता एका अधिकाऱ्याचा निमंत्रित सदस्य म्हणून समावेश करावा.**

आदेशानुसार,

**(सुभाष नलावडे)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

२) सचिव-१ (का.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

३) सचिव-२ (का.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

४) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कर्मचारी

५) निवडसूची

\\MLS-DATASERVER\C Branch\1401\C-101\Local Disk (d)\E Drive\2024\Department Promotion Committee (D.P.C)\memo.docx